# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठात ‘‘जागतिक दिव्यांग दिन’’ उत्साहात साजरा

दि.३ डिसेंबर २०१९ रोजी संपूर्ण जगभरामध्ये दिव्यांग दिन साजरा केला जातो. याच अनुषंगाने टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विभागाच्यावतीने जागतिक अपंग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमा दरम्यान दिव्यांग प्रती सामाजिक सद्‌भावना निर्माण करणेसाठी समाजकार्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व प्राध्यापक यांनी शपथ घेतली. ती शपथ खालीलप्रमाणे आहे.

‘‘ मी सत्यनिष्ठेने शपथ घेत आहे की, आपल्या भारत देशातील दिव्यांग बंधु-भगिनींप्रती सदैव संवेदनशील राहून, त्यांना आदरपूर्वक, समतेची, सामाजिक न्यायाची व समानतेची वागणूक देईन. तसेचे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व भेदभाव विरहीत सामाजिक वातावरण निर्मिती साठी मी सदैव प्रयत्नशील राहीन. त्याचबरोबर त्यांच्या सामाजिक सहभाग व सामाजिक सुरक्षेकरीता कटिबध्द राहीन’’

या कार्यक्रमाप्रसंगी विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव डॉ.जयवंत पाटील, बहिस्थ शिक्षण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. रंजना पाटील, संगणकशास्त्र विभागाचे श्री.शार्दुल उल्हाळकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकार्य विभागाचे विभागप्रमुख डॉ.प्रकाश यादव यांनी केले तसेच समाजकार्य विभागाच्या सहा.प्रा.गीता जोशी यांनी शपथ वाचन केले.

सदर कार्यक्रमाच्या आयोजना संदर्भात विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ.दीपक टिळक, मा.प्र.कुलगुरू डॉ.गीताली टिळक - मोने, मा.प्र.कुलसचिव डॉ. अभिजीत जोशी तसेच कार्यकारी अध्यक्ष डॉ.रोहीत टिळक आणि मा. सचिव श्री. अजित खाडीलकर यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.


Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune
(Deemed to be University)
Department of Social Work
Celebrates



